सन २०१७-१८ करीता इको टुरि झम (राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांच्या विकास कामांकरिता निधी वितरण. (२४०६ २२९५)

महाराष्ट्र शासन

महसुल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : निसप-२०१७/ प्र.क्र.१६६/फ- ५

मंत्रालय, मुंबई -४००० ०३२

दिनांक :-२७ मार्च, २०१८

वाचा - १) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.निसप१११७/प्र.क्र.१६६/फ-५, दि.२०.०१.२०१८

२) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं/२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८

प्रस्तावना -

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी सन २०१७-१८ करिता इको टुरीझम राज्य योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास या योजनेंतर्गत पुणे वनवृत्तातील, भांबूर्डा वन परिक्षेत्रातील मौजे हिंगणे व मौजे कोथरुड येथील निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकासा अंतर्गत नविन बाब प्रस्तावाचे कामासाठी रु. ३०८.८३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास उपरोक्त दि.२०.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून सदर शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र "क" मध्ये दर्शविल्याप्रमाणे यापैकी ५० % म्हणजेच रु.१५४.४२ इतका निधी पहिल्या टप्प्यात वितरीत करण्यात आला आहे.

राज्य योजना सन २०१७-१८ करीता इको टुरीझम (राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) या योजनेअंतर्गत रू.८०००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित आहे. या निधीपैकी ८० % निधी वितरीत करण्यास वित्त विभागाच्या उपरोक्त दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सदर कामांसाठी वितरीत करावयाचा उर्वरित ५० % निधी मंजुर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता

शासन निर्णय :-

अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपुर यांनी प्रस्तावित केल्यानुसार पुणे वनवृत्त (पुणे विभागातील), भांबूर्डा वन परिक्षेत्रातील मौजे हिंगणे व मौजे कोथरुड येथील उपरोक्त दि.२०.०१.२०१८ च्या शासन निर्णया सोबतच्या प्रपत्र "अ" व "ब" मध्ये नमूद केलेल्या निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकासा अंतर्गत नविन बाब प्रस्तावाचे कामासाठी रु.३०८.८३ लक्ष इतका खर्च करण्यास विहित अटी व शर्तींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर कामांसाठी मंजूर केलेल्या रक्कमेपैकी दुस-या टप्यात वितरीत करावयाच्या निधीचे विवरण खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

प्रपत्र "क"

अ.क्र.	नियंत्रक अधिकारी	निसर्ग पर्यटन क्षेत्राचे नाव	मंजूर तरतूद (रुपये लाखात)	पहिल्या टप्यात वितरीत केलेला (रुपये लाखात)	आता वितरीत करावयाचा निधी (रुपये लाखात)
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), पुणे	मौजे हिंगणे सर्व्हे क्र.१७	२६.३९	१३.२०	१३.१९
२	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), पुणे	मौजे हिंगणे सर्व्हे क्र. १८	११९.९२	५९.९६	५९.९६
३	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), पुणे	मौजे कोथरुड सर्व्हे क्र.१०२	१६२.५२	८१.२६	८१.२६
		एकूण	**३०८.८३**	**१५४.४२**	**१५४.४१**

सदरहू शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५/अर्थ-३ दि.०६.०२.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१८४६१८८६१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vaishnav M N
Digitally signed by Vaishnav M N
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Endustries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c2af1b03cee224a81b9f9c9cd2b1e6abe5e60e2c4801c2c6a3ba14985ec4fb8b, cn=Vaishnav M N
Date: 2018.03.27 18:50:53 +05'30'

(म.न.वैष्णव)

कक्ष अधिकारी , महसूल व वन विभाग

प्रति,

(१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
(४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर.
(५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.
(६) उप वनसंरक्षक, पुणे
(७) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
(८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
(९)कक्ष अधिकारी (व्यय-१०)(विनियम)/, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(१०) ब-१/फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग ,मंत्रालय, मुंबई.
(११) निवड नस्ती, फ-५